भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय)

<u>कोटेशन मागविणेची नोटीस</u>

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता खालील कामा करिता दि.१७/०७/२०२६ ते दि.२३/०७/२०२६ याकालावधीत कोटेशन प्रसिद्ध करण्यात येत असुन दि.२५/०७/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत कोटेशन मागविण्यात येत आहेत.कामाबाबतची संपुर्ण माहिती आरोग्य विभागाकडून घेऊनच कोटेशन भरावीत.नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करासहीत व खर्चासहीत भरावीत तद्नंतर कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही.कमी किंवा जास्त दराचे कोटेशन मंजुर अथवा नामंजुर करणे अगर सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.उशीरा आलेले कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्ते सफाई करणेसाठी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ४ युनिट महाराष्ट्र शासना मार्फत ३ असे एकुण ७ युनिट कार्यन्वित करणेसाठी एकुण ७ वाहनचालक व १४ हेल्पर यांची आवश्यकता आहे.

त्याच प्रमाणे सदरचे वाहने कार्यन्वित झाले नंतर त्यांची देखभाल सुरु करावी लागणार असल्याने याकरिता इच्छुक संस्था यांचेकडुन मासिक खर्च मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक संस्था यांनी ७ युनिट व १४ हेल्पर पुरविणे कामी किमान वेतन दरा प्रमाणे मासिक खर्च सादर करणे त्याच प्रमाणे ७ युनिट स्विपीग मशीन यांची देखभाल दुरुस्ती मधील येणारे सर्व साहित्य पुरविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करणे इत्यादीसह मासिक खर्च व सर्व करासहित संस्थेच्या लेटरहेडवर वरिल नमुद कालावधी मध्ये घनकचरा विभाग (मुख्यालय) येथे सादर करावेत.

उप-आयुक्त (घनकचरा)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

तारीख :-

खालील ठिकाणी प्रसिद्ध केली .

मनपा मुख्यालय कार्यालय नोटीस बोर्ड
कोंडवाडा नोटीस बोर्ड
मनपा संकेतस्थळ

81 MY DOC-2026 (TENDER FORM-2026)